North Asian International Research Journal of Multidisciplinary

IRJIF IMPACT FACTOR:6.019

ISSN: 2454-2326 | Vol. 7, Issue-12 | December-2021

Index Copernicus Value: 58.12 | DOI NUMBER: 10.5948/2454-2326.2021.00008.0 | Thomson Reuters ID: S-8304-2016

NAIRJC | A Peer Reviewed Refereed Journal

# पश्चिम विदर्भातील पर्यटन स्थळांचा ऐतिहासिक अभ्यास

## HISTORICAL STUDY OF TUREST PLACES IN WESTERN VIDARBHA

प्रसन्न प्रकाश बगडे

सहा. प्राध्यापक श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी जि. अकोला महा.

DR. PRASANNA PRAKASH BAGDE

Assistant Professor

Shri Ganesh Art's College, Kumbhari, Akola MS

सार :

प्रस्तुत संशोधनामध्ये पश्चिम विदर्भातील धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यात आला आहे. पश्चिम विदर्भामध्ये अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाणा या जिल्हयांचा समावेश होतो. या जिल्हयामध्ये ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामधील विविध प्रकारच्या प्राचीन परंपरा आज सुध्दा टिकून आहेत. काळाच्या ओघामध्ये या ऐतिहासिक प्राचीन स्थळांचे पर्यटन स्थळांमध्ये रूपांतरण झालेले आहे. या ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक स्थळांचा संबंध मानवाने आपल्या श्रध्दा, भावना आणि विचारांशी जांडलेला दिसून येतो. अशास्थितीत या प्राचीन पर्यटन स्थळांचा इतिहास काय आहे याचा अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

**1.1** प्रस्तावना :

पर्यटन ही इतिहासाची एक सुप्रस्थापित शाखा आहे. सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनाचा संबंध इतिहासाशी जोडला गेला आहे. पर्यटन स्थळांच्या माध्यमातुन स्थानिक परंपरा, संस्कृती, इतिहास आणि पूर्वजांचा इतिहास तसेच विविध विचार प्रवाह यामाध्यमातुन प्रतिबिंबित होतात. भारतीय पर्यटनाचा इतिहास प्रत्येक कोप-यामध्ये अंतर्भूत आहे. पर्यटनाला भारतीय संस्कृतीच्या इतिहासाचा वारसा लाभलेला आहे. धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पर्यटन स्थळांमध्ये त्या सर्व ठिकाणांचा समावेश आहे जेथे आपल्या भूतकाळाची भव्यता दर्शवलेली आहे तसेच तेथूनच देशाला कीर्ती प्राप्तं झाली आहे. यामध्ये काही पर्यटन स्थळे ही जागतिक वारसा स्थळांपैकी आहेत. भारतातील पर्यटनामध्ये किल्ले, राजवाडे, मंदिरे, मशिदी, चर्च, शाळा, दफनभूमी, विजयस्तंभ व निसर्गसंपत्तीने भरलेली ठिकाणे यांचा समावेश आहे. भूतकाळातील ही स्मारके त्याची स्थापना, सौंदर्य, कृपा, प्रेम, आवड, कला यांनी परिपूर्ण आहेत. या संशोधनामध्ये पश्चिम विदर्भातील पर्यटन स्थळांचा अभ्यास करण्यात आला आहे. पश्चिम विदर्भामध्ये प्रमुखत: अमरावती येथील अंबादेवी मंदीर, भक्तीधाम मंदीर, कौंडण्यंपूर मंदिर, रिध्दपूर येथील महानुभाव पंथाचे मंदीर ही प्रमुख पर्यटन स्थळे आहेत. अकोला

येथील राज राजेश्वंर मंदिर, सालासर हनुमान मंदीर, रूद्रायणी माता मंदीर, पातुरच्या लेण्या, नरनाळा किल्ला व अभयारण्यं, बाळापूरचा किल्ला, कालंकादेवी मंदीर बार्शिटाकळी, वारीचा मारोती आणि डॅम या प्रमुख पर्यटन स्थळांचा समावेश आहे. यवतमाळ जिल्हयांमध्ये चिंतामणी गणपती मंदीर कळंब, कंबलपोश बाबा दर्गा, जगदंबा देवी केळापूर या ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि निसर्गरम्यं पर्यटन स्थळांचा समावेश आहे. वाशिम जिल्हयामध्ये वाशिम येथील पुरातन बालाजी मंदीर, पार्श्वनाथ मंदीर शिरपूर जैन, गुरूदत्तं मंदीर कारंजा लाड, बंजारा समाजाची काशी पोहरादेवी ही प्रमुख पर्यटन स्थळे आहेत. बुलढाणा जिल्हयामध्ये खा-या पाण्याचा लोणार सरोवर, शेगाव येथील श्री संत गजानन महाराजांचे मंदीर आणि आनंद सागर, बालाजी मंदीर व्यंकटगिरी, बालाजी मंदीर मेहकर, सैलानी बाबा दर्गा सैलानी, रेणूका माता मंदीर चिखली, श्री क्षेत्र बुधनेश्वंर, हनुमान मुर्ती नांदुरा, राजमाता जिजाऊ जन्मंस्थ्ळ सिंदखेड राजा, गिरडा या प्रमुख पर्यटन स्थळांचा समावेश आहे.

या ऐतिहासिक स्थळाचे प्राथमिक स्वरूपाचा विचार करता प्रत्येक पर्यटन स्थळाचा विशिष्ट इतिहास आहे. आजच्या स्थितीमध्ये ही ऐतिहासिक ठिकाणे पर्यटन स्थंळ म्हणून नावरूपास आलेली असली तरी या ठिकाणाच्या संदर्भातील एक विश्वास या ठिकाणाच्या संदर्भातील एक शक्ती व श्रध्दा लोकांमध्ये वास करते. पूर्वजांच्या कार्यकृतीची प्रचिती या ऐतिहासिक पर्यटन स्थळाच्या माध्यमातून होण्यासाठी लोक या ठिकाणी जातात. परंतु जसजसा कालखंड बदलत गेला तसतसे विविध प्रकारचे सामाजिक सांस्कृतिक परिवर्तन घडून आली आणि त्यामुळे या पर्यटन स्थळांचे ऐतिहासिक महत्व आबधित राहून ही पर्यटन स्थळे म्हणून उच्चं शिखरावर पोहचल्याचे दिसून येतात. वस्तुता या ऐतिहासिक स्थळांचा इतिहास काय आहे ज्यामुळे या ठिकाणाची निर्मिती झालेली आहे याचा शोध ऐतिहासिक अभ्यासाच्या माध्यमातुन या संशोधनामध्ये घेण्याचा प्रयत्नं केला गेला आहे. जेणेकरून बदलत्या परिस्थितीमध्ये या ऐतिहासिक ठिकाणाचे पूर्वी असलेले महत्वं आजच्या काळात बदलत गेले आहे याचा अभ्यास होऊ शकेल. प्रस्तुत संशोधनामध्ये पश्चिम विदर्भात पर्यटन स्थळांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**1.2** संशोधनाची उदि्दष्टे :

1. पश्चिम विदर्भातील धार्मिक पर्यटन स्थळांच्या इतिहासाचा अभ्यास करणे.
2. पश्चिम विदर्भातील सांस्कृतिक पर्यटन स्थळांच्या इतिहासाचा अभ्यास करणे.
3. पश्चिम विदर्भातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या इतिहासाचा अभ्यास करणे.

**1.3** संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनामध्ये पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम आणि यवतमाळ या पाच जिल्हयातील धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांचाच अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

**1.4** संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनामध्ये ऐतिहासिक वर्णनात्मंक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. पश्चिम विदर्भातील धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक पर्यटन स्थळाला प्रत्यक्ष भेट देऊन तसेच या संदर्भात उपलब्ध साहित्याचा अभ्यास करून या पर्यटन स्थळांचे ऐतिहासिक अध्यंयन करण्यात आले आहे. या संशोधनासाठी प्राथमिक व व्दितीय साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**1.5** विषय विश्लेषण :

प्रस्तुत संशोधनामध्ये पश्चिम विदर्भातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक पर्यटन स्थळाच्या इतिहासाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**1.5.1** अमरावती जिल्हयातील धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा इतिहास :

रिध्दपूर :

अमरावती जिल्हयामध्ये रिध्दपूर हे महानुभाव पंथाची काशी म्हणून ओळखली जाते या ठिकाणी संपूर्ण भारतातुन आणि विदेशामधून महानुभाव पंथाचे उपासक मोठया श्रध्देने येतात. या पर्यटकांमध्ये प्रामुख्याने श्रध्दा हा घटक प्रमुख मानल्या जातो. ही भूमी श्री गोविंदप्रभु, श्री चक्रधर स्वामी, श्री नागदेवाचार्य यासारख्या महापूरूषांच्या वास्तंव्याने पुनित झाल्याचे मानल्या जाते.

कौडण्यंपूर मंदिर :

वर्धा नदिच्या काठावर हे एक ऐतिहासिक धार्मिक पर्यटन स्थंळ आहे. येथी भिष्माची राजधानी असल्याची चर्चा आहे. कार्तिकी पोर्णिमेस येथे विठठल रूख्मिणीची यात्रा भरते या यात्रेला विविध भागामधून पर्यटक येथे येतात. कौंडण्यपूर येथील मंदिर आणि तेथील टेकडयांमुळे आणि या टेकडयावर उत्खनामध्ये सापडलेल्या एका पुरातन नगरीमुळे याकडे बहुतांश पर्यटक आकर्षित होते. कैडण्यपूर हे कुडिन किंवा कौडिण्यं या ऋषीचे नाव या गावाला मिळाले तरी अनेक राजवटी या नगरीने पाहिल्या आहे असे दिसून येते. तिस-या ते सातव्या शतकापर्यंत वाकाटकांची सत्ता या भूमीवर होती.

एकविरा देवी संस्थान :

विदर्भातील मोठी बाजारपेठ असलेल्या अमरावती शहरामध्ये महानयोगी श्री. प. पू. जनार्दन स्वामी यांनी एकविरा देवीची स्थापना केली आहे. एकविरा देवीचे नाव अंबादेवीच्या आज्ञेनुसार प्रचलित झाले असल्याची आख्यायिका आहे. एकवीरा देवी शारदीय नवरात्र हा या संस्थानमधील महत्वाचा उत्संव मानला जातो या वेळी स्थानिक आणि बाहेरील पर्यटक मोठया प्रमाणात येथे मोठया श्रध्देने येतांना दिसून येतात. याशिवाय मध्यंतरीच्या काळामध्ये सुध्दा पर्यटकांची मोठया प्रमाणात रेलचेल या ठिकाणी दिसून येते.

भक्तीधाम मंदिर :

चांदूर बाजार परिसरात भक्तीधाम हे पर्यटकांच्या आकर्षनाचे केंद्रं ठरले आहे येथे श्री संत गुलाबराव महाराज यांचे जन्मस्थान तसेच कर्मस्थान आहे. यांचे असंख्यं भाविक नित्यनेमाने आणि मोठया श्रध्देने येथे येतांना दिसतात. या ठिकाणी भक्तांना विश्वबंधुत्वाचा परिपूर्ण आनंदाचा व आत्मंशांतीचा मार्ग दाखविण्याचे कार्य भक्तीधामच्या माध्यमातुन केले जाते. या पर्यटन स्थळाच्या

विकास होण्यासाठी केंद्र सरकारच्या तीर्थक्षेत्र पुनरूज्जीवन आणि अध्यात्मीक प्रोत्साहन उपक्रम योजनेला अनुसरून या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयाला केंद्र सरकाने मंजुरी दिली आहे.

बहिरम :

बहिरम हे संस्थान खुप प्रसिध्दं आहे या ठिकाणचे मंदिर हे 125 फूट उंचीवर असून चढण्यास 108 पाय-या आहेत. येथील गणपती मूर्ती साडेसहा फूटाची असून मंदिरासमोरील घंटा सहा टन वजनाची आहे. या ठिकाणी प्रामुख्याने बहिरम भैरवाची पूजा केली जाते. येथे दरवर्षी महिनाभर यात्रा चालते. येथे मातीच्या हंडीत शिजवलेले मटन खास चवीचे म्हणून प्रसिध्दं आहे. हजारो पर्यटक या यात्रेनिमित्यं या ठिकाणी येतात.

गुरूकुंज आश्रम :

ग्रामगीतेचे निर्माता, ग्रामस्वच्छतेचे पुजारी, अंधश्रध्दा निर्मूलनासाठी अविरत अविश्रांत झाटलेले समाजप्रबोधक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी मोझरी येथे गुरूकुंज आश्रमाची स्थापना केलेली आहे. हा आश्रम पर्यटकांचे लक्ष वेधून घेणारा आहे सबके लिये खुला है, ये मंदिर हमारा हे ब्रीद वाक्यं या आश्रमाच्या प्रवेश व्दारावर दिसून येते. त्यामुळे येणा-या प्रत्येक भाविकाला या पर्यटन स्थळाविषयी आपुलकीची भावना निर्माण होते या मार्गावरूण जाणारे बहुतांश भाविक व पर्यटक या आश्रमाला भेट देतात.

भातकुली जैन धर्मियांचे तीर्थक्षेत्र :

भातकुली ही तीर्थक्षेत्र पर्यटकांना शांत, शुचिर्भूत आणि निरामय अनुभूती देते. या गावाची स्थापना रूक्मिणीचा भाऊ राजा रूक्मी यांनी केली. त्यांनी चैत्यालयाची निर्मिती करून श्री आदिनाथ यांच्या काळया पाषाणाच्या मूर्तिची प्रतिष्ठापणा केली. पुढे मुघल काळात ही मुर्ति बचाव म्हणून एका किल्ल्यात जमीनदोस्तं करण्यात आली. अठराव्या शतकात गावाच्या प्रमुखास स्वप्नामध्ये या मूर्तीचे रहस्य उलगडले आणि तेथे उत्खंनन केले असता तेथे ही मूर्ती आढळून आली. ब-याच कालावधीनंतर नेमसागर महाराजांनी येथे भेट दिली असता त्यांना ही मूर्ती जैन धर्माचे पहिले तीर्थकार भगवान आदिनाथ यांची असल्याचे उमगले आणि मोठया आस्थेने गावक-यांनी येथे चैत्यालयाची स्थापना केली.

**1.5.2** अकोला जिल्हयातील धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे :

बाळापूरचा किल्ला :

बाळापूर या गावाला प्राचीन इतिहास आहे. मध्ययुगीन काळामध्ये अकबराने सर्वप्रथम व-हाडातील बाळापूरवरच आक्रमण केले होते. या ठिकाणचा किल्ला मजबुत व राकट असून सुरक्षेच्या दृष्टिने त्रिस्तरीय बांधकाम करण्यात आले आहे. दक्षिणेचा सुभेदार म्हणून औरंगजेबाचा मुलगा अदिलशहा येथे वास्तव्यास होता त्यानेच या किल्यांच्या पायाभरणीस प्रारंभ केला होता. ऐलिचपुरचा नवाब इस्माइल खान याने किल्याचे दोन परकोट बांधले एक परकोट अष्टकोणी तर दुसरा चौकोणी आहे. बाळापूर शहरामध्ये नदीकिनारी एक छत्री आहे मिर्झा राजे जयसिंग यांची छत्री म्हणून ओळखल्या जाते.

नरनाळा किल्ला :

अकोट तालुक्याच्या उत्तरेला 24 कि.मी. अंतरावर सातपुडयांच्या उंच डोगरावर नरनाळा किल्ला पसरलेला आहे. हा किल्ला जमिनीपासून 3161 फुट उंचीवर आहे. किल्यांचा विस्तार 382 एकर आहे. गडाच्या प्रवेशाला 5 दरवाजे आहे त्यावरूण या गडाच्या सुरक्षा व्यवस्थेची कल्पना येते. या गडावर सक्कंर तलाव नावाचा विर्स्तीर्ण जलाशय आहे याला बारमाही पाणी असते. हा तलाव यांच्या ओषधी गुणांकरिता पंचक्रोशीत प्रसिध्दं आहे. नरनाळा अभयारण्यं हे मेळघाट व्याघ्रं प्रकल्पाचा एक भाग आहे याच अभयारण्यात नरनाळा किल्ला आहे. या किल्ल्याचा पहिला उल्लेख तारिख-ए-फरीश्ता या ग्रंथात आढळतो. तर किल्याची दुरूस्ती बहामनी घराण्यातील नववा राजा अहमदशहा वली याने केल्याचा उल्लेख आहे. अनेक पर्यटक या ठिकाणी येतांना दिसतात.

पातुरच्या लेण्या :

मुगल काळात पातुर येथे नानासाहेब व शहाबाबु या संतांचा उदय झाला नानासाहेबांचे मंदिर व वाडा आणि हजरत शहाबाबु दर्जा ही येथील ठिकाणे आहेत. पातुर येथील बोर्डी नदीत सत्तंरच्या दशकात शेकडो सोन्याची नाणी सापडली होती. या गावाजवळ वाकाटककालीन लेण्या आहेत त्या अजिंठा पर्वतरांगेतील डोगरात तयार करण्यात आल्या आहेत. हया लेण्या विदर्भावर तिस-या चवथ्या शतकातील वाकाटक घराण्यातील शेवटचा राजा हरिसेन याने त्यांच्या वराहदेव या प्रधानाकडून त्या तयार केल्याचे सांगण्यात येते. हया सर्व लेण्या बौध्दं लेण्या असाव्यात असे दिसते परंतु एका लेणीमध्ये महादेवाची पिंड कोरली आहे. याशिवाय या लेण्यामागे धार्मिक श्रध्दा असल्याचे सुध्दा दिसून येते.

रेणूकादेवी मंदिर :

पातुर येथील रेणूकादेवी मंदिर हे विदर्भात सर्वाचे श्रध्दास्थान मानले जाते. पातुर शहराजवळील बोर्डी सुवर्णा नदीच्या किनारी असलेल्या टेकडीवर रेणूका देवीचे मंदिर आहे. याठिकाणची मूर्ती ही पूर्वीपासुनच तेथे एका झाडाखाली होती. नंतर तेथे मंदिराचा जिर्णोध्दार करण्यात आला. ही देवी नवसाला पावणारी असुन भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारी असल्याची भाविकांची श्रध्दा आहे.

राज-राजेश्वंर मंदिर :

अकोला शहरातील जुने शहर भागामध्ये असलेले राज-राजेश्वंराचे मंदीर अकोला शहराचे ग्रामदैवत आहे. फार प्राचीन असा इतिहास या मंदीराला लाभलेला असून महादेवाचे फार भव्यं असे शिवलिंग या ठिकाणी आहे. अकोलसिहांची पत्नी या महादेवासी निस्सिम भक्त होती ती पहाटे दर्शनासाठी नियमित या मंदिरात येत होती राजाला राणीवर संशय आल्याने त्याने एकदा तिचा पाठलाग केला. राणी शिवलींगाचे दर्शन घेत असतांना राजा मनोमन खजील झाला पण संशय घेतल्याने राणी दुखावली व तिने राजेश्वराला स्वतामध्ये सामावून घेण्याचे साकडे घातले त्याचक्षणी पिंड दुभंगुण राणी त्यात गुप्तं झाल्याची आख्यायिका आहे. दरवर्षी श्रावण महिण्यामध्ये याठिकाणी मोठा उत्संव असतो.

कालंकादेवी मंदिर बार्शिटाकळी :

बार्शिटाकळी येथे काळया दगडापासून निर्मित कालंका देवीचे मंदिर व मुर्ति आहे. हे मंदिर अकराव्या शतकात काळया दगडापासून बनविण्यात आले आहे. 1177 मध्ये या मंदिराचे बांधकाम करण्यात आल्याचे पुरावे मिळतात. ही देवी स्थानिकांचे ग्रामदैवत आहे. वास्तुशास्त्राच्या आधारावर या मंदिराचे बांधकाम केले असल्याचे लक्षात येते. या मंदिराला प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.

रूद्रायणी देवी मंदिर :

पातुर तालुक्यामध्ये चिंचोली गावाजवळ रूद्रायणी देवीचे प्राचीन मंदिर आहे. या देवीच्या नाववरूणच या गावाला चिंचोली रूद्रायणी हे नाव पडलेले आहे. हे देवी दुर्गा या देवतेचे देवस्थान आहे ते 14 वे शक्तीपीठ मानले जाते. हे मंदिर टेकडीवर असून दरवर्षी नवरात्रामध्ये मोठया प्रमाणात भाविकांची गर्दी येथे दिसून येते. प्रभू रामचंद्रं वनवासात असतांना या ठिकाणी दोन वेहा येऊन गेल्याचा इतिहास पुराणात सांगण्यात येतो. याशिवाय बैल पोळयाला या ठिकाणी बैलांना दर्शनासाठी आणण्याची प्रथा आहे.

सालासर बालाजी मंदीर :

अकोला शहरामध्ये गंगा नगर भागात हे मंदिर आहे. यामध्ये हनुमानजी, श्रीराम दरबार श्री राधाकृष्णं आणि श्री शिव परिवार यांची मूर्ती आहे. दरवर्षी येथे सालासर मंदिर उत्संव साजरा करण्यात येतो. याठिकाणचा स्वच्छं व सुशोभित परिसर पाहुन मनाला प्रसन्नंता आणि शांती मिळते. विविध धार्मिक कार्यक्रमामुळे भक्तांची गर्दी दिवसेंदिवस याठिकाणी वाढत आहे.

वारी भैरवगड :

सातपुडयाच्या पायथ्याशी वसलेले वारी हे फार पुरातन ठिकाण आहे येथे हनुमान मंदिर असून या मंदिराची स्थापना रामदास स्वामींनी केल्याचे बोलल्या जाते. याठिकाणी मारोतीची 15 फुट उभी मूर्ती असुन या मूर्तीच्या पायाशी राक्षस असून हातावर द्रोणागिरी पर्वत आहे. याठिकाणी हनुमान जयंतीला विशेष यात्रा भरते. तसेच याठिकाणी भैरवगड नावाची अत्यंत जिर्णअवस्थेतील गढीवजा इमारत आहे येथे पूर्वी गोंड राजाचा किल्ला असल्याचे बोलल्या जाते.

अकोली जहागिर :

अकोट तालुक्यामध्ये अकोली जहागिर येथे गजानन महाराजांचा वारसा लाभलेला आहे या ठिकाणी महाराजांनी जलमय केलेली विहीर असुन ती पाहण्यासाठी धार्मिक हेतूने अनेक पर्यटक याठिकाणी येतात.

**1.5.3** वाशिम जिल्हयातील पर्यटन स्थळे :

बालाजी देवस्थान :

वाशीम शहरामधील बालाजी मंदिर एक जुने मंदिर आहे हे तिर्थस्थान प्राचीन व पुज्यंनिय आहे. व्यंकटेश्वंर बालाजीच्या मंदिरातील मूर्ती विनाशापासून वाचविण्यासाठी औरंगजेबाच्या कारर्किर्दीत पुरल्या गेल्या अशी आख्यायिका आहे. या मंदिराचे काम 1700 ते 1776 दरम्यान पूर्ण झाल्याचे

शिलालेखावरून दिसून येते. मंदिरातील प्रतिमा काळया दगडाची आहे. येथील बालाजीचे दर्शनाकरीता शेकडो प्रवासी भाविक येथे येऊन राहतात.

पोहरादेवी मंदिर :

पोहरादेवी आणि बंजारा समाज यांचे अतूट असे नाते आहे. बंजारा व्यक्तीच्या जीवनात पाहरादेवी या गावाला अनन्यं साधारण महत्वं आहे बंजारा समाजाची काशी म्हणून सुध्दा त्याला संबोधण्यात येते. सुमारे 276 वर्षापूर्वी संतमुर्ती सेवादास महाराज हे बंजारा वंशात अवतारी पुरूष होवून गेले. सेवादास महाराजांना बंजारा समाज कुलदैवत मानतात. सेवादास महाराजांनी मूत्यूपूर्वी आपल्या समाधीची जागा पोहरादेवी या गावी मोठया चिंचेच्या झाडाखाली दाखवली होती व तेथेच समाधी घेतली असल्याची आख्यायिका आहे. त्यामुळे बंजारा समाजामध्ये या ठिकाणाला अनन्यं साधारण महत्वं प्राप्तं झाले आहे.

पार्श्वनाथ मंदिर :

जैन धर्मियांची काशी म्हणून शिरपूरची ओळख आहे. हे एक ऐतिहासिक तिर्थक्षेत्र असुन पार्श्वनाथ भगवान स्वामींची अतिशय प्राचीन मुर्ती अधर स्थितीत याठिकाणी आहे. देशभरातुन जैन धर्माचे श्रावक ती पाहण्यासाठी येतात. हे तिर्थक्षेत्र जगामध्ये प्रख्यांत असल्यामुळे या गावाला नावलौकीक प्राप्तं झाला आहे. या मंदिरामध्ये 16 दिंगबर तिर्थकरांच्या मुर्ती विराजमान आहेत. 23 वे तीर्थकार पार्श्वनाथ भगवान व पदयावती देवीची संगमरावरची मुर्ती मुळरूपात दिगंबर अवस्थेत स्थापित आहे.

गुरूदत्तं मंदिर :

थोर दत्तावतावरी श्री नृहिंह सरस्वतीचे जन्मंस्थान म्हणून कारंजा नगरी या शहराची प्रसिध्दी आहे. श्री वासुदेवानंद सरस्वती व श्री ब्रम्हानंद सरस्वती स्वामी यांच्या प्रयत्नांने श्रीगुरूच्या या जन्मस्थानाची महती सर्व दत्तंभक्तांना पटलेली दिसते. याठिकाणच्या गुरूमंदिरामुळे हे गाव दत्तंभक्तांसाठी प्रिय झाले आहे.

**1.5.4** बुलढाणा जिल्हयातील पर्यटन स्थळे :

सिंदखेड राजा :

विदर्भाच्या कुशीत बुलढाणा जिल्हयात असलेले सिंदखेड गावाला जाधव रावांच्या राजे उपाधीवरूनच सिंदखेडला सिंदखेड राजा या नावाने ओळखले जात होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोळ म्हणून एक आगळे महत्वं या गावाला प्राप्तं झाले आहे. सिंदखेडचे मुळ नाव आलापुर, सिंधु राजाच्या नाववरून सिंदखेड आणि राजे लखुजी जाधवरावांच्या नावावरून सिंदखेडराजा तसेच राजमाता राष्ट्रमाता जिजाऊचे जन्मस्थंळ म्हणून आज मातृतीर्थ सिंदखेडराजा या नावाने सिंदखेड भारताच्या इतिहासामध्ये अजरामर ठरले आहे. सिंदखेड येथील काही अवशेषावरूण 12 व्या शतकापासून सिंदखेड अतिशय महत्वाचे तिर्थक्षेत्र होते. महाराष्ट्रामधील अनेक राजघराण्यांनी इतिहास घडविला त्यामध्ये सिंदखेडकर लखुजी जाधवराव यांच्या घराण्याचा सिहाचा वाटा आहे. या घराण्यामध्ये एकापेक्षा एक

असे अनेक विर जन्माला आले. जिजाऊ सारख्या वीर कन्या, वीर पत्नी, वीर माता याच घरण्यामध्ये प्रकट झाल्या आहेत. याठिकाणी राजवैभवाची साक्ष देणारी अनेके स्मारके, प्रसाद, महल, गढया, मंदिरे तलाव समाधी स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात.

श्री संत गजानन महाराज मंदीर :

शेगाव येथे श्री संत गजानन महाराजांचे भव्यं मंदिर आहे. महाराष्ट्रातुनच नव्हे तर संपूर्ण भारतातुन पर्यटक याठिकाणी मोठया श्रध्देने येतात. संत गजानन महाराजांचे प्रथम दर्शन दिंगबर बाल रूपामध्ये झाले आणि आपल्या 32 वर्षाच्या अवतार कार्याव्दारे अध्यात्मिक जगतामध्ये अढळ स्थान निर्माण केले त्याचे भव्यं समाधी मंदीर उभारण्यात आले आहे. विविधी सोयी सुविधांची उपलब्धता मंदिर प्रशासनाकडून करूण देण्यात येते त्यामुळे भाविकाची सदैव गर्दी याठिकाणी दिसून येते. तसेच स्थानिक पर्यटनाला चालना देण्यासाठी आनंद सांगरची निर्मीती करण्यात आली ज्यामाध्यमातुन पर्यटक मोठया प्रमाणात या ठिकाणी आकर्षित होतांना दिसून येतात.

बालाजी मंदिर व्यंकटगिरी :

बुलढाणा जिल्हयातील राजुर घाट या निसर्गरम्यं परिसरामध्ये व्यंकटगिरी बालाजीचे भव्यं मंदिर आहे. तिरूपाती बालाजीची प्रतिकृती या ठिकाणी साकारण्यात आली असून परिसरात डोगंर द-या आहेत.

बालाजी मंदिर मेहकर :

याठिकाणी भगवान शारांगधर बालाजीचे 120 वर्षापेक्षा जुने मंदिर आहे. या ठिकाणी सापडलेल्या तांबे, पितळ, सोने या धातुमध्ये कोरलेले शिलालेख व जडजवाहीर ब्रिटीश संग्रहालय इंग्लंडमध्ये आहेत. दरवर्षी याठिकाणी बालाजी उत्सवं साजरा करण्यात येतो.

बालाजी मंदिर देऊळगाव राजा :

याठिकाणी असलेले जुने बालाजी मंदिर महाराष्ट्राचे तिरूपती मंदिर म्हणून ओळखले जाते. 1665 मध्ये राजे जगदेवराव जाधव यांनी हे मंदिर बांधले आहे. दरवर्षी ऑक्टोंबर महिन्यात याठिकाणी बालाजी महाराज यात्रेचा उत्सवं साजरा केला जातो त्यासाठी अनेक पर्यटक याठिकाणी मोठया श्रध्देने येतात.

सैलानी बाबा दर्गा :

बुलढाण्याजवळ प्रसिध्दं सैलानी तीर्थक्षेत्र आहे. देशभरातुन अनेक भक्तं सैलानी येथे येतात. हे तीर्थक्षेत्र सर्व धर्मिय असून दर वर्षी याठिकाणी भव्यं यात्रा भरते. हे ठिकाण म्हणजे सर्वधर्मीयांची पंढरीच समजल्या जाते, जात, पात, धर्म पंथ विसरून आपेआप माथे जेथे श्रध्देने झुकतो अशी ही पावनभूमी आहे.

श्री क्षेत्र बुधनेश्वरं मढ :

बुधनेश्वरं येथे पैनगंगा नदीचे उगमस्थान आहे. आख्यायिका नुसार पैनगंगेचे महात्म्यं असे सांगण्यात आले की, पूर्वी एकेकाळी सहयांद्री पर्वतावर गंगाजलाने भरलेला ब्रम्हंदेवाचा कमंडलू सांडला तेव्हा पासून हे स्थान कुंडीका तीर्थ या नावाने प्रसिध्दं आहे.

हनुमान मूर्ती :

नांदुरा शकरामध्ये 105 फूट उंचीची सार्वत मोठी भगवान हनुमानाची मूर्ती आहे. शहरातील हे एक प्रमुख पर्यटन आकर्षन आहे.

गिरडा :

अजिंठा पर्वत रांगामध्ये अध्यात्मिक पातळीवर नावाजलेला परिसर पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतो. या ठिकाणी असलेल्या प्राचीन महादेव मंदिरामुळे या गावाला जुनी ओळख आहे. पांडव वनवासात असतांना अर्जुनाने बाण मारून इथे पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत निर्माण केला त्यातून पाच झरे निर्माण झाले तेच पाणी गोमूखातून आजपर्यंत अव्यंहतपणे बाहेर पडतांना याठिकाणी दिसते.

**1.5.5 यवतमाळ जिल्हयातील पर्यटन स्थंळे :**

**चिंतामणी गणपती मंदिर :**

श्री गणेशपुराणात अखंड भारतातील 21 गणेशस्थाने वर्णिलेली आहेत त्यातील एक स्थान म्हणजे विदर्भातील यवतमाळ जिल्हयातील श्री चिंतामणी कळंब येथील मंदिर होय. हे एक प्राचीन ऐतिहासिक स्थंळ आहे. श्री चिंतामणी स्वयंभू आहेत असे मानणा-या भक्तांची संख्या मोठया प्रमाणात आहे. या मंदिरातील मूर्तीची स्थापना साक्षात कदंब ऋषींनी केल्याचे मानल्या जाते. हे मंदिर हेमांडपंथी असून 7 व्या 8 व्या शतकात चालुक्यं किंवा द्रविडी शैलीच्या प्रभावकाळात निर्माण झालेले आहे. तर या देवालयाचा जिर्णोध्दार 12 व्या 13 व्या शतकात यादवांच्या काळात झाला असावा असे दिसून येते. याठिकाणी मोठया भक्तीभावाने असंख्यं पर्यटक येतांना दिसून येतात.

कंबलपोष बाबा दर्गाह :

आर्णी हे गाव अरूणावती नदीच्या तीरावर बसलेले आहे. याठिकाणीच कंबलपोष बाबा यांची मोठी यात्रा भरते. हिंदू-मुस्लीम व इतर धर्मीय सुध्दा या ठिकाणी येवून दर्ग्यांवर चाद चढवितात त्यातुन राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन येथे पाहावयास मिळते.

जगदंबा संस्थान केळापूर :

याठिकाणी मॉ जगदंबेचे अतिप्राचीन हेमांडपंथी मंदीर आहे. याठिकाणी आध्रं प्रदेश व विदर्भातील भाविक मोठया संख्येने येथे येतात. 1982 ते 1987 या काळात या मंदिराचा जिर्णोध्दार करण्यात आला आहे.

**1.6** निष्कंर्ष :

पश्चिम विदर्भाला धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा मोठा वारसा लाभलेला आहे. यामधील बहुतांश पर्यटन केंद्रं हे सर्व धर्म सहिष्णूता आणि विश्वबंधूत्वांच्या आधारावर कार्य करिता असून असंख्यं भाविक, पर्यटक याठिकाणी येतांना दिसून येतात. याठिकाणी असलेले

पर्यटन स्थळे ही गतवैभवाची साक्ष आज सुध्दा देतांना दिसून येतात. या धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पर्यटनाच्या माध्यमातुन अनमोल अशा प्राचीन वारश्याचे हस्तांतरण आधुनिक पिढीकडे होतांना दिसून येते. तात्कालीन प्रथा परंपरा, किल्ले, मंदिरे, कला कलसुरी, साहस यांचे मूतिमंद प्रतिक म्हणून आज सुध्दा प्रेरक ठरत आहेत. अशा या ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी मोठया प्रमाणात विविध हेतूने पर्यटकांची रेलचेल दिसून येत. यावरूण पश्चिम विदर्भातील या पर्यटन स्थळांना मोठा प्राचीन इतिहास लाभलेला आणि पर्यटनाच्या माध्यमातुन हा इतिहास तेवत ठेवण्याचे कार्य सदयस्थितीमध्ये सुरू आहे. या पर्यटन स्थळांचा आणखी प्रसार प्रचार करण्यासाठी पर्यटन विकास महामंडळ, तीर्थक्षेत्र विकास प्राधीकरण यामाध्मयातुन या धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा विकास आणि प्राचीन वारसा जपणे काळाची गरज आहे. या ऐतिहासिक वारश्याचे मूर्तीमंद स्वरूप काळाच्या ओघात नष्टं होण्याच्या मार्गावर आहे.

संदर्भ ग्रंथ :


- कारंजकर, भि. दे. अमरावती शहराचा इतिहास. अमरावती : महानगर पालिका शताब्दी ग्रंथ.
- माने, ग. का. (1998). अमरावती एक ऐतिहासिक शहर. नागपूर-अमरावती विदयापीठ इतिहास परिषद स्मंरणिका.
- Maharashtra state Gazzetter Amravati District.
- गोडबोल आशुतोष. (2015). गाविलगड वैभवशाली बांधकामाचा बलदंड किल्ला www.thinkmaharashtra.com/node/2217
- कोलते, वि.भी. श्री गोंविद प्रभू यांचे चरित्र. मलकापूर : कोलते प्रकाशन.
- दीक्षित मोरेश्वरं (1968). एक्स्क्व्हेशन अॅक्टं कौंडण्यंपूर. मुंबई.
- विदर्भिय कुलस्वामीनी श्री एकविरा देवी अमरावती पुस्तीका.
- Maharashtra State Gazerreers Department. Amravati District Gazetteers https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/AMRAVATI/places_Chandur%20Bazar.html
- खोरगडे कुमुदिनी. राष्ट्रसंत तुकडोजी : चिकित्संक अध्ययंन. पुणे : महाराष्ट्रं राज्यं साहित्यं संस्कृती मंडळ.
- Maharashtra State Gazerreers Department. Amravati District Gazetteers https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/AKOLA/places_Balapur.html
- चितळे श्रीपाद (2005). विदर्भातील किल्ले. नागपूर : मंगेश प्रकाशन.
- वडतकार जयंत पातुरच्या लेण्यांची माहिती.
- जाधव राजू नामदेव (2009). आदिशक्ती रेणूका. माहुरगड : श्री रेणूकादेवी संस्थान सातवी आवृत्ती.
- देशपांडे कृष्णंराव वत्संगुल्मं प्राचीन वाशीम. परभणी : विश्वनाथ प्रिटींग प्रेस.

- काळू ज्ञा. ग. आणि काळू भवनीपंत (1994). वाशिमच्या श्री बालाजी देवस्थानचा इतिहास. औरंगाबाद : मंगेश प्रकाशन.
- श्री. नृसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थान. श्री क्षेत्र कारंजा जिल्हा वाशीम माहिती पुस्तीका.
- केतकर श्रीधर व्यंकटेश. महाराष्ट्रीय ज्ञानकोष. मुंबई : यशवंतराव चव्हांण प्रतिष्ठान.
- बाहेकर एस. ए. (2009). राजे लखुजी जाधवराव. जळगाव : कसब प्रकाशन.
- देशमुख विजय (1962). सिंदखेड राजा पुरातत्वं व वस्तुसंग्रहालयाचे विभाग महाराष्ट्रं शासन मुंबई
- संत गजानन महाराज मंदिर व आंनद सागर माहिती पुस्तीका 2017
- Maharashtra State Gazerreers Department. Amravati District Gazetteers https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/YAVATMAL/his modern%20period.html
- मांडवकर पवन. (2015). वैदर्भीय अष्टंविनायक. कळंब : डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र इंदिरा महाविदयालय.